प्□र□ पहिले

प्रस्तावना

१.१ प्रास्ताविक :

मनुष्याच्या सर्वांगीण विकासात ज्ञानसंवर्धन, बौध्दीक व वैचारीक विकास, व्यावहारीक □ार्यक्षमता, व्यावसायिक पात्रता, शारीरिक स्वास्थ, नागरीकत्व व सामाजिकता, सौंदर्याभिरुची व रसिकता, नैतीकता व आध्यात्मीकता, सह्रदयता व मानवता, क्रीयाशीलता व सृजनशीलता असा सर्व घटकांचा अंतर्भाव होतो व हया विकासात खेळांची महत्वपूर्ण भूमीका आहे.

□ळ ही एक सामाजिकरणाची संस्था आहे त्यामुळे जीवनात खेळास फार महत्व आहे.खेळामुळे व्यक्तीचे जीवन सुखी व आनंदी बनते.समाजात मानाचे स्थान मिळून संघवृत्ती, बंधुत्वाची भावना, सहकार्य, सामाजिक गुणांचा विकास, आज्ञाधारकता, सहनशीलता, तत्परता, सत्यत, आदरनियता, समायोजन, नम्रता इ.गुणांचा विकास होऊन उत्कृष्ट नागरीक बनण्यास पात्र ठरतो.खेळाच्या मैदानावर रंग, धर्म, जात, वंश, भाषा यांचा भेदभाव कधीच आढळून येत नाही.खेळामुळे व्यक्तीस संघर्ष एक महत्वपूर्ण बाब आहे.

□ळ ही मानवाची जन्मजात सहज प्रवृत्ती आहे.बालकापासून वृध्दापर्यंत स्त्री-पुरुष □ळ □ळत असतात.देश, काल, स्थल व परिस्थितीनुसार □ोणता ना कोणता खेळ खेळणे हा मानवाचा स्वभावधर्मच बनून गेला आहे.खेळ ही एक कला आहे.तसेच शास्त्र ही आहे.

□ळाचे भविष्य कल्पनेत स्वप्नरुप असेच आहे व प्रशिक्षण सुध्दा तसेच असते.कारण विज्ञा-नास बऱ्याच गोष्टी अजून संशोधित करता आलेल्या नाहीत. जे खेळात घडते शास्त्रीय दृष्टया समजून घेणे सुध्दा काही वेळेस कठीण असते.

१.२ संशोधन समस्येचे शीर्षक :

आंतर - महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभा□ी हो□ाऱ्या व सहभा□ी -न हो□ाऱ्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता स्तर व अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास

१.३ संशोधनाची आवश्यकता आणि महत्व :

१९९४ सालापासून नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ स्थापन □रण्यात आले आहे.या विद्यापीठांतर्गत नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली या जिल्ह्यातील महाविद्यालयांचा समावेश होतो.नांदेड येथे कला, वाणिज्य व विज्ञान शाखांची महाविद्यालये आहेत.शिक्षण वैद्यकीय, आयुर्वेद, अभियांत्रिकी व विधी महाविद्यालये व अध्यापक महाविद्यालये आहेत.जिल्ह्यातील सर्व तहसील ठिकाणी महाविद्यालये आहेत.

१. आंतर -महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या व सहभागी न हो□ाऱ्या विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता स्तर ओळखण्यास मदत होते.

२. विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीचा अभ्यास करता येतो.

३. विद्यार्थ्यांची व खेळाडूंची शारीरिक क्षमता वाढविण्यास मदत होईल.

४. विद्यापीठाच्या आंतर -महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्य विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता वाढवता येईल.

५. आंतर-महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे प्रमाणात वाढ होण्यास मदत होईल.

१.४ संशोधनाची उद्दिष्टे :

१. विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमतेचे मापन करुन स्तर निश्यिती करणे.

२. विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीचे मापन करणे.

३. आंतर-महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या व सहभागी न होणाऱ्या विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता स्तराची तुलना □र□.

४. □ीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या व सहभागी न होणाऱ्या विद्यार्थ्यांची अभिवृत्तीची तुलना करणे.

५. आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढीस लावणे.

६. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेबाबत गैरसमज दूर करणे.

७. आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी न होणाऱ्या विद्यार्थ्यांची कारणे शोधणे.

१.५ संशोधनाची गृहितके :

१. संशोधनाकरिता विद्यार्थी कसोटयांना योग्य प्रतिसाद देतील.

२. संशोधनाकरीता कसोटया विषयी साहयकांना योग्य ज्ञान आहे.

३. विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये सदर संशोधनासाठी सहकार्य करतील.

४. संशोधनाकरीता विद्यार्थी व खेळाडू योग्य प्रतिसाद देतील.

१.६ परिकल्पना :

H१. क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या व सहभागी न होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता स्तरात फरक असेल.

H१. क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या व सहभागी न होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभिवृत्ती मध्ये फरक असेल.

H०. क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या व सहभागी न होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता स्तरात सार्थक फरक आढळणार नाही.

H०. क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या व सहभागी न होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभिवृत्ती मध्ये सार्थक फरक आढळणार नाही.

१.७ संशोधनाची परिसिमा :

१. प्रस्तुत संशोधनातील विद्यार्थी हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास संलग्नीत महाविद्यालयातील आहेत.

२. प्रस्तुत संशोधनातील क्रीडा स्पर्धेतील सहभाग आंतर महविद्यालयीन स्पर्धेपुरतेच मर्यादित असेल.

३. प्रस्तुत संशोधनातील शारीरिक क्षमता घटक व कसोटया मर्यादित असतील.

४. प्रस्तुत संशोधनातील विद्यार्थी व खेळाडू हे मुले यांच्या पुरतेच मर्यादित असतील.

५. प्रस्तुत संशोधनातील विद्यार्थी १८ ते २५ वर्ष वयोगटातील आहेत.

प्रकरण दुसरे

संबंधित साहित्याचे समालोचन

२.१ प्रास्ताविक :

संशोधन समस्येची निवड त्याचप्रमाणे समस्येचे निराकरण करण्यासाठी योग्य मार्ग, संबंधित माहिती देणारा अर्थपूर्ण नकाशा म्हणजे संबंधीत संदर्भसाहित्य, संशोधनसमस्येची निवड करण्यासाठी सखोल दृष्टी व स्पष्ट समज संबंधित संदर्भ साहित्याच्या अभ्यासाने संशोधकास मिळते.

गार्डनर, (२००९)आणि इतर सहकाऱ्यांनी १३४४ शहरी किशोरांच्या अध्ययनात बाल गुन्हेगारी आणि संघटीत क्रीडा स्पर्धामध्ये सहभागीते दरम्यान संबंधाचा अभ्यास केला आहे. त्यांनी खेळांमध्ये सहभाग घेणाऱ्या तरुणांची फक्त गैर-एथलेटीक क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग करणाऱ्या तरुण आणि जे तरुण कोणत्याच क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होत नाही अशा तरुणांशी तुलना केली. त्यांनी गुन्हेगारी आणि खेळा दरम्यानच्या अप्रत्यक्ष संबंधाचा ही अभ्यास केला.अंततः त्यांनी, किती मर्यादेपर्यंत लिंग आणि पूर्व समस्यांचा, क्रीडा भागीदारी आणि गुन्हेगारी दरम्यान प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संबंधाचा ही अभ्यास केला.तुलनात्मक अध्ययनाअंती असे लक्षात आले की, गैर-हिंसक गुन्हेगारीची संभावना खेळांमध्ये सहभागी न होणाऱ्या मुलांपेक्षा खेळांमध्ये सहभागी होणाऱ्या मुलांमध्ये अधिक प्रमाणात आढळून आले.

तथापी लेखकांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंव मर्यादीत असले कुठल्याही प्रकारचे संबंध तरुण आणि हिंसक गुन्हेगारी दरम्यान आढळून आले नाही.त्याचप्रमाणे तरुणीमध्ये सुध्दा खेळ आणि हिंसक गुन्हेगारी दरम्यान संबंध आढळून आले नाही.

हॉवी, यांनी प्रस्तुत अध्ययनात दर्शविले आहे की, शाळेतील तासिका व्यतिरिक्त स्पर्धामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांचा दर कमी आहे.त्यांचे उत्कृष्ट प्रदर्शन शाळांशी संबंधीत आहे.त्यांच्या सामाजिक कौशल्य आणि समस्यांच्या व्यवहारात पण सुधार झालेला आहे.तथापी भुतकाळात झालेले अनेक अध्ययन मोठया मुलांच्या (१२ वर्षापेक्षा अधिक) लहान समुहांपर्यंतच मर्यादीत आहेत.

प्रस्तुत विश्लेषणात ६ ते ११ वर्षा पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या शालेय तासिका व्यतिरिक्त स्पर्धामध्ये आणि राष्ट्रीय प्रातिनिधीक सर्वेक्षणात सहभाग करण्यामधील संभावित सहयोगाचे आकलन करण्यात आले होते. सर्वेक्षणाचे अनुमान वर्ष २००३-२००४ च्या २५,९९७ मुलांच्या स्वास्थावरील सर्वेक्षणावर आधारीत होते.

रे-ग्रफो, यांनी इ.एल.ई शाळांपैकी तीन शाळांून निवडलेल्या दुसऱ्या आणि चौथ्या इयत्तेतील निवडक २३३२ विद्यार्थ्यांच्या सहाय्याने संशोधन केले. प्रशिक्षणापूर्वी सर्व विद्यार्थ्यांची उंची, वजन, फोर साईट, स्क्रीन फोल्ड मोजणी केली. ५० यार्ड डॅश, उंच उडी, शटन रन, लवचिकता चाचणी आणि ९ मिनिटे धावणे/ चालणे अशा शारीरिक क्षमता घटकांची मोजणी केली. सर्व मुलांची दुसऱ्या इयत्तेतील मुलांचा एक आणि चौथ्या इयत्तेतील मुलांचा दुसरा अशा दोन गटांमध्ये विभागणी करण्यात आली.दुसऱ्या इयत्तेतील मुलांच्या प्रायोगिक गटाला रोज १२

मिनिअे एरोबिक कसरतींचा व्यायात २१ आठवडे देण्यात आला.प्रशिक्षणानंतर त्यांच्या या सर्व □मता घटकांची जोर या कारक तंदुरुस्तीचा कसोटया घेतल्या.

निष्कर्ष : १२ ते १४ वयोगटातील मुलांच्या शारीरिक क्षमता व कारक क्षमता घटकांवर ॲरोबिक व्यायाम प्रकारांचा साध्र परिणाम आढळून आला.

मॉल्स-ा-फिशफिल्ड,यां-ी १६ आठवडयाच्या शारीरिक क्षमता वाढीच्या प्रशिक्षणाचा अग्निशामक दलातील कर्मचाऱ्यांच्या शारीरिक क्षमता आणि शरीररचनेच्य मोजमापांवर परिणामांचा अभ्यास केला. सरासरी ३३.८ वयोमानाच्या १५ पुरुष कर्मचाऱ्यांनी ४ महिन्यांच्या एरोबिक आणि वजन प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतला.संशोधनासाठीच्या ९ सदस्यांच्या □टाचे सरासरी वयोमान ३४.२ असे होते. सर्व कर्मचाऱ्यांची अस्ट्रांडऱ्हायमिंग ग्रेडेड सायकल टेस्ट उंच उडी, सिट अप्स, पुशअप्स, हॅन्ड ग्रीप, लंग फंक्शन, एव्हॅल्युएान, लवचिकता आणि शरीर संरचना विश्लेषण या चाचण्या प्रशिक्षणापूर्वी आणि नंतर अशा दोन वेळा घेतल्या. नियंत्रित आणि प्रायोगिक गटांच्या एक्सरसाईज एच.आर.आणि सिस्टोलिक रक्तदाबात सारखीच घट नोंदविण्यात आली. मात्र प्रायोगिक गटातील कर्मचाऱ्यांची इतर शारीरिक □मतेच्या चाचणीमध्ये सुधारणा दिसून आली.

टेपे, यांनी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेत कसरतींच्या परिणामांचा अभ्यास केला.त्यांनी नार्थ साईड मिडल स्कूलच्या ७ व्या आणि ८ व्या इयत्तेतील १९९ विद्यार्थी विद्यार्थीनीवर प्रयोग केला.प्रशिक्षणपूर्व आणि अंतिम चाचणीद्वारे माध्यमिक शाळेतील या विद्यार्थ्यांच्या क्षमतेतील बदलांचा अभ्यास त्यांनी केला. चाचणी गटामध्ये सीटअप्स, शटल रन, एक मैल धावणे/ चालणे, पुलअप्स किंवा फ्लेक्सड् आर्म हॅंग आणि सीट ॲण्ड रिच या

चाचण्यांच्या समावेश केला होता. विद्यार्थ्यांना पूर्ण शालेय वर्ष शारीरिक व्यायामाचे प्रशिक्षण देण्यात आले.सांख्यिकीय विश्लेषणाद्वारे क्षमतेत अल्प वाढ झाल्याचे निदर्शनास आले.

Shrivastava N.N. (1980), : A Study of the scientific attitude and its measurement.

उद्दिष्टे:

१. वैज्ञानिक अभिवृत्ती मापनासाठी साधन विकसित करणे.

२. शास्त्र शिक्षक व इतर शिक्षकांचा वैज्ञानिक अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. विज्ञानाचे विद्यार्थी व इतर विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक अभिवृत्तींचा तुलनात्मक अभ्यास □र□.

३६ घटक असलेल्या अभिवृत्ती मापिकेमध्ये ६ घटक आहेत.जिज्ञासा, विशाल दृष्टीकोन, अंधश्रध्देचे निर्मुलन, बौध्दिक क्षमता व योग्य मूल्यांकन.

थर्स्टच्या पध्दतीने निवड केलेली आहे.लिकर्टच्या सुधारित आवृत्ती सारखी आहे.विश्वसनीयतेचे व प्रमाणिकरणाचे मापन ०.९ एवढे आले.विश्लेषणातून दोन घटकांचे प्रभुत्व लक्षात आले आहे.५० शास्त्र शिक्षकांवर व इतर ५० शिक्षकांवर चाचणी घेण्यात आली.रँडम पध्दतीत १०० विद्यार्थी मध्य प्रदेशातील ५० विद्यार्थी व इतर विद्यार्थी यांची चाचणी घेण्यात आली.

निष□र्ष:

१. वैज्ञानि□ ज्ञानाचा परिणाम वैज्ञानिक अभिवृत्तीबद्दल सकारात्मक दिसून आला.

२. वैज्ञानि□ ज्ञानाची मदत अभिवृत्ती वाढण्यासाठी मदत होते.

३. वैज्ञानिक दृष्टीकोनातून मुलांमुलीत फरक दिसून आला.

शि□□-शिक्षिकेत वैज्ञानिक भिन्नतेचा फरक दिसून आला नाही.

डोनाल्ड च्यू, यांच्यामते, “महाविद्यालयीन क्रीडा सहभागातील स्त्री-पुरुष विषमता ही आर्थिक साधनसामग्री, रंचनात्मक फरक व सवलती यामुळे पडतो.”अन्यंवू एस.यू.यांनी नायजेरियातील महिलांच्या क्रीडा सहभागाचा सक्रीय अभ्यास केला आहे.त्यांनी हा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीने केला आहे.त्यांच्यामते, “महिलांचा क्रीडासहभाग हा तेथील सामाजिक वातावरणाचा परिपाक असतो.स्त्री-पुरुष सहभाग हा सामाजिकरणाच्या व्यापक प्रक्रियेचा एक मौलि□ भा□ असतो.सामाजिकरण कसे होते, त्यावर सहभागाची गती अवलंबून असते.”नायजेरिया सारख्या आफ्रिकन देशातील परिस्थिती ही भारतापेक्षा वेगळी नाही.तिसऱ्या जगातील बहुसंख्य राष्ट्रात □टुंबातून पुरुष खेळाडूंना अधिक प्राधान्य दिले जाते व स्त्री खेळाडूंची उपेक्षा केली जाते.मुलाकडे मेहेरनजर आणि स्त्रियांची उपेक्षा यामुळे मुलीच्या खेळातील सहभागाकडे दुर्लक्ष होते ही बाब या अभ्यासामुळे प्रथमच जगातील शास्त्रज्ञांच्या लक्षात आली.अशाप्रकारची विषमता ही त्यामुळे संशोधकाचा अभ्यास विषय बनली.याच लेखिकेचा आणखी एक लेख महत्त्वाचा होय. त्यामध्ये स्त्री-पुरुष विषमतेचा प्रश्न चर्चिला आहे.सनातनी पारंपारि□ भूमि□ा ही स्थान व प्रतिष्ठा यात फरक करते.“The process by which individuals learn expected behaviors, thoughts and dispositions is termed socialization. Socialization theory- that most behaviors in and of itself has no inrent value.”यावरुन त्यांच्या विश्लेषणाची कल्पना येते.

प्रकरण तिसरे

संशोधन पध्दती

३.१ प्रास्ताविक :

संशोधनाच्या विविध पध्दती आहेत.यापैकी प्रस्तुत संशोधनात संशोधकाने वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे.वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये विविध पध्दती आहेत.त्यांतील तुलनात्मक पध्दतीचा उपयोग केला आहे.

३.२ जनसंख्या :

प्रस्तुत संशोधनामध्ये एकूण जनसंख्या ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाड विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थी आणि आंतर महाविद्यालयातील स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी आहेत.

३.३ न्यादर्श :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने न्यादर्शाची निवड एकूण जनसंख्या हीच न्यादर्श म्हणून केली आहे.त्यासाठी सहेतुक पध्दतीचा वापर केला आहे.

३.४ संशोधनाची साधने :

माहिती संकलित करण्यासाठी प्रस्तुत संशोधनात वापरात येणारे संशोधनाचे साधनाची यादी पुढीलप्रमाणे,

कोष्टक क्र. ३.१

संशोधन साधनाची यादी

चल	घटक	साधने	एकक
शारीरिक क्षमता	रुधिराभिसरण दमदारपणा	१२ मिनिटे धावणे/ चालणे	मीटर
	स्नायूची ताकद	पुशअप्स	अंक
	स्नायूचा दमदारपणा	सिट अप्स	अंक
	लवचिकता	सिट ॲन्ड रिच	से.मी.
	वेग	५० मीटर डॅश	सेकंद
	दिशाभिमुखता	शटल रन	सेकंद
	शक्ती	स्टॅंडिंग ब्रॉड जम्प	से.मी.
	तोल	स्टोर्क स्टॅन्ड	सेकंद
अभिवृत्ती	अभिवृत्ती मापन	प्रश्नावली	गुण

३.५ संख्याशास्त्रीय साधने :

यात खालील सांख्यिकीय साधनांचा वापर केला जाणार आहे.मध्यमान, प्रमाण विचलन, प्रमाण त्रुटी, ॲनोवा, पोस्ट हॉक इत्यादी.

प्रकरण चौथे

माहितीचे पृथःकरण व सांख्यिकी विश्लेष

४.१ प्रास्ताविक

प्रस्तुत संशोधनामध्ये मिळालेल्या माहितीचे अर्थनिर्वचन करुन निष्कर्ष काढण्याकरीता वर्णनात्मक व अनुमानात्मक सांख्यिकीचा आधार घेण्यात आला.वर्णनात्मक सांख्यिकीमध्ये मध्यमान, प्रमाण विचलन, प्रमाण त्रुटी इत्यादी परिणामांचा वापर करुन निवडलेल्या न्यादर्शाचे बाबतीतील माहितीचे अर्थनिर्वचन करण्यात येणार आहे.

आलेल्या निष्कर्षांचे सामान्यीकरण करण्यकरीता तसेच परीकल्पनांचे परीक्षणासाठी ANOVA चा वापर करुन तुलना करण्यात येणार आहे. जेथे आवश्यकता आहे तेथे POST Hoc टेस्ट वापरण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

सारांश, निष्कर्ष व शिफारशी

५.१ प्रास्ताविक :

सारांश, निष्कर्ष व शिफारशी या प्रकरणातून संशोधनकर्त्याने हा शोध प्रबंध पुर्णत्वास नेण्याकरीता प्रकरण १ ते ४ मध्ये केलेल्या व मांडलेल्या बाबीचा आढावा संक्षिप्त स्वरुपात या प्रकरणात उदघोषित करण्यात येईल. त्याच बरोबर प्रकरण ४ मधून सहजरित्या पुढे आलेले निष्कर्ष व त्या अनुषंगाने प्रकरण १ मध्ये केली गेलेली परिकल्पना त्यांच्याशी पडताळून पाहण्यात येईल. त्याचा उल्लेख या प्रकरणातून केला जाईल. शिवाय या शोध प्रबंधाला अनुसरुन संशोधनकार्य करीत असतांना आढळून आलेल्या गोष्टी, सूचना व शिफारशीच्या माध्यमातून मांडण्यात येईल.

संदर्भ सूची

१. जर्दे, श्री.आ. (१९९५), शारीरिक शिक्षण तत्वे व स्वरुप, कोल्हापूर : चंद्रमा प्रकाशन.

२. मुळे, रा.शं. व उमाटे, वि.तु. (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

३. भिंताडे, वि.रा. (२००८) शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे नित्य नुतन प्रकाशन.

४. दि.गो. वाखारकर : "शारीरिक शिक्षा का आधुनिक स्वरुप तथा अध्ययन" २००६, पान □. ७-१२.

५. डॉ.कंवर आर.सी. "शारीरिक शिक्षा के सिध्दात एवं इतिहास", अमित ब्रदर्स पब्लि□श-स, -ना□पूर.

६. Gardner, Margo; Roth, Jodie; Brooks-Gunn, Jeanne; Sports Participation and Juvenile Delinqency : The Role of the Per Context among Adolescent Boys and Girls Varied Histories of Problem Behavior, Development Psychology, Journal Articles; Reports - Research, २००९, ४५(२), P. ३४१-३५३.

७. Howie, Lajeana D.; Lukacs, Susan L.; Pastor, Patricia N.: Reuben, Cynthia A.; Mendola, Pauline, Participation in Activities outside of School Hoours in Relation to Problem Behavior and Social Skills in Middle Childhood, Journal of School Health, Journal Articles; Reports - Research, २०१०, ८०(३), P.११९-१२५.

८. Renfrow, N.E. (१९८२). The effects of organized sport/ fitness programme on second and fourth grade student. Npblished Disertation, University of Arkanas, Fayteeville Arkansas.

९. Moulson-Litchfeild, M.D. (१९८५). Consequences of sixteen week aerobic and weight training regiman of firefighter fitness. Unpublished master's thesis, Univeristy of Massachusetts, Amherset. Completed research in health physical education & recreation. (१९८६) २८,१०५.

संशोधक

प्रा.मुंडे दत्ता रामकिशन
क्रीडा संचालक,
उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी
ता.जळकोट जि.लातूर

मार्गदर्शक

डॉ.मनोज नरेंद्र रेड्डी
क्रीडा संचालक,
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ परीसर,
नांदेड

आंतर - महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या व सहभागी न होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता स्तर व अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास

शारीरिक शिक्षण विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक
प्रा.मुंडे दत्ता रामकिशन

मार्गदर्शक
डॉ.मनोज नरेंद्र रेड्डी

शारीरिक शिक्षणशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्च २०१५